श्री स्वामी विवेकानंद शिक्षण संस्थेचे

# विवेकानंद कॉलेज

## कोल्हापूर

# समाजशास्त्र विभाग

VIVEKANAND COLLEGE KOLHAPUR
ESTD
JUNE
1964
(Autonomous)

ज्ञान,विज्ञान आणि सुसंस्कार यासाठी शिक्षण प्रसार

श्री. स्वामी विवेकानंद शिक्षण संस्थेचे

# विवेकानंद कॉलेज, कोल्हापूर (स्वायत्त)

कोल्हापूर

## बी. ए. भाग ३

## समाजशास्त्र विभाग- २०१९-२०२०

## सेमिस्टर:६-स्पेशल पेपर-१५(अ)

## विषय - औद्योगिक समाजशात्र





VIVEKANAND COLLEGE KOLHAPUR
ESTD
JUNE
1964
(Autonomous)

**प्रकल्पाचे नाव :-**

Gokul

कोल्हापूर येथील गोकुळ दूध संघाचा अभ्यास.

**विद्यार्थ्यांची नावे :-**

१) पाटील निलेश ज्ञानदेव (५६४५)

२) पाटील प्रमोद मारुती (५६५०)

३) भोसले अरुण शिवाजी (५५०९)

४) जाधव प्रणव बबन (५५५५)

५) नरुटे प्रथमेश पांडुरंग (५६२४)

**मार्गदर्शक :-** प्रा. विकास मस्के सर

विभाग प्रमुख

HEAD
DEPARTMENT OF SOCIOLOGY
VIVEKANAND COLLEGE, KOLHAPUR
(AUTONOMOUS)
विवेकानंद कॉलेज, कोल्हापूर (समाजशास्त्र विभाग)

VIVEKANAND COLLEGE KOLHAPUR (Autonomous) ESTD JUNE 1964

मार्गदर्शक

## अभ्यासपद्धती :-

प्रस्तुत प्रकल्पामध्ये तथ्य संकलनासाठी मुलाखत व निरीक्षण या प्राथमिक स्रोतांचा उपयोग केला आहे. आम्ही त्या ठिकाणी प्रत्यक्ष जाऊन त्या संघाचे कामकाज कसे चालते याचे योग्य निरीक्षण केले. मुलाखत या तंत्राचा वापर करून आम्ही गोकुळ संघाचे संचालक तथा संघात काम करणारे कर्मचारी यांच्याकडून दूध संघ कशाप्रकारे कार्यरत आहे या माहितीचा आढावा घेतला.

तसेच विविध अहवाल,वर्तमानपत्रे आणि इंटरनेट यांचा दुय्यम स्रोत म्हणून उपयोग करण्यात आला आहे.

औद्योगिक समाजशात्र विषयांतर्गत पश्चिम महाराष्ट्रामधील एक अग्रगण्य दूध संस्था म्हुणुन गोकुळ संघाचा अभ्यास करण्याचे आम्ही ठरवले होते.

या सर्व अभ्यास पद्धतीमुळे प्रकल्प अहवाल तयार करण्यामध्ये कोणतीही अडचण आली नाही व संशोधन कार्य यशश्वीरित्या करता आले. त्याचे स्पटीकरण पुढील प्रकल्पामध्ये आहे.

VIVEKANAND COLLEGE KOLHAPUR (Autonomous) ESTD JUNE 1964

## संशोधनाची उद्दिष्ट्ये :-

१) गोकुळ दूध संघामार्फत होण्याऱ्या औद्योगिक क्षेत्रातील प्रगतीचा आढावा घेणे.

२) संघाकडून होण्याऱ्या सामाजिक उपक्रमांची माहिती जाणून घेणे.

३) संघाच्या कामकाजाचा आढावा घेणे.

४) प्रशिक्षणाच्या कोणत्या सोयी उपलब्ध आहेत याचा आढावा घेणे.

५) रोजगारासाठी कशाप्रकारे संधी उपलब्ध केल्या जातात याची माहिती मिळवणे.

६) महिल्यांच्या सबलीकरणासाठी कोण-कोणत्या योजना आहेत यांची सविस्तर माहिती घेणे.

७) दूध उत्पादकांसाठी कोण-कोणत्या योजना वा उपक्रम राबवले जातात याची सविस्तर माहिती घेणे.



VIVEKANAND COLLEGE KOLHAPUR ESTD JUNE 1964 (Autonomous)

# अनुक्रमणिका


| अ.क्र. | घटक | पृ.क्र. |
|---|---|---|
| १) | प्रस्तावना | १ |
| २) | संघाची पार्श्वभूमी | २ |
| ३) | संघाची वैशिष्ट्ये | ३ |
| ४) | संघाची उद्दिष्ट्ये | ४ |
| ५) | कामकाज | ५-७ |
| ६) | उत्पादने | ८ |
| ७) | गुणनियंत्रण | ९ |
| ८) | मार्केटिंग (पणव) | १० |
| ९) | प्रशिक्षणाची सोय | ११-१४ |
| १०) | महिलांचे सबलीकरण | १५-१७ |
| ११) | दूध उत्पादकांसाठी योजना/ उपक्रम | १८-२४ |
| १२) | सामाजिक उपक्रम | २५-२६ |
| १३) | सारांश आणि निष्कर्ष | २७ |
| १४) | संदर्भ सूची | २८ |
| १५) | टिपलेले काही क्षण | २९-३० |




VIVEKANAND COLLEGE KOLHAPUR (Autonomous) ESTD JUNE 1964

## प्रस्तावना :-

अठराव्या शतकाच्या मध्यापर्यंत भारतात अनेक उद्योगधंदे व कसबी कारागिरीचे व्यवसाय भरभराटीस आले होते. अनेक जागतिक बाजारांत भारतीय वस्तूंना, विशेषतः सुती व रेशमी कापड, शाली, जरीकाम व किनखाब ह्यांना मागणी होती. परंतु इंग्लंडमधील औद्योगिक क्रांतीमुळे भारतीय उद्योगधंद्यांवर विपरीत परिणाम होऊन अठराव्या शतकाच्या अखेरीपर्यंत ते जवळजवळ लयास गेले.

युद्धोत्तर काळात एकी कडे उत्पादन घटत होते आणि किंमती वाढत होत्या. मजुरवर्गातील असंतोष पराकोटीला गेला होता व उद्योगधंद्यांत अपेक्षित भांडवल गुंतवणूक होत नव्हती. यावर तोडगा म्हणून मजुर आघाडीवर सरकारने औद्योगिक समेटाचे धोरण अंगिकारले, तर औद्योगिक आघाडीवर विश्वास वाढविण्यासाठी १९४८ साली आपले औद्योगिक धोरण जाहीर केले. हे औद्योगिक धोरण सरकारच्या एकूण आर्थिक व राजकीय धोरणाशी सुसंगतच होते.

बी. ए. भाग तीन समाजशास्त्र विभागाअंतर्गत सेमिस्टर-६ मध्ये पेपर क्रमांक १५(अ) औद्योगिक समाजशात्र या विषयाचा समावेश करण्यात आला आहे. या विषयांतर्गत आम्ही महाराष्ट्राच्या सहकार उद्योग क्षेत्रातील अग्रगण्य स्थान असलेल्या गोकुळ दूध संघाचा अभ्यास या विषयाची निवड केली आहे.

आम्ही निवडलेल्या विषयासंबंधी सदर प्रकल्प करत असताना हा संघ जाप्रकारे कार्यरत आहे हे जाणून घेण्याची संधी आम्हाला मिळाली. उद्योग क्षेत्रातील सहकार हा जसा नाविन्यपूर्ण प्रयोग ठरला आहे तसेच उद्योग क्षेत्राच्या विकासासाठी निराळ्या कल्पनांची प्रेरणा गोकुळ मधून मिळाली.सदर प्रकल्पात आम्ही प्रकल्पाची अभ्यासपद्धती तसेच या संघाबद्दल सविस्तर माहिती मांडलेली आहे.



VIVEKANAND COLLEGE KOLHAPUR (Autonomous) ESTD JUNE 1964

## संघाची पार्श्वभूमी :-

'गोकुळ' या ब्रँड नावाने प्रसिद्ध असलेला कोल्हापूर जिल्हा सहकारी दूध उत्पादक संघ मर्या. हा 'ऑपरेशन फ्लड' योजने अंतर्गत स्थापन झालेला जिल्हा सहकारी दूध संघ असून त्याची स्थापना १६ मार्च १९६३ रोजी झाली आहे. त्यानंतर दुधाचे संकलन, विस्तार, पशु आरोग्य, पशु प्रजनन, दूध प्रक्रिया आणि उत्पादन तसेच विपणनाच्या क्षेत्रात अनेक मोठे टप्पे गोकुळने पार केले आहेत. आज 'गोकुळ' कडे कोल्हापूर येथे ७ लाख लिटर क्षमतेचा अत्याधोनिक डेअरी प्लँट असून स्वतःची ५ शीतकरण केन्द्रे आहेत. त्यांची हाताळणी क्षमता ५.२५ लाख लिटर इतकि आहे. वाशी मुंबई येथे संघाचे स्वतःचे अत्याधुनिक पॅकिंग स्टेशन आहे.

दूध उत्पादन वाढ व जनावरांचे आरोग्य सुधारणेसाठी संघाकडे सध्या ४३ फिरते पशु वैद्यकिय मार्ग, ४३० क्लस्टर्स आणि १७ स्थायी कृतीम रेतन केंद्रे आहेत. संघाचा 'महालक्ष्मी' या ब्रँडखाली दररोज २०० मेट्रिक टन उत्पादन क्षमतेचा स्वतःचा पशुखाद्य प्रकल्प आहे. तसेच दररोज ३०० मेट्रिक टन क्षमतेचा (५०० मेट्रिक टन विस्तारक्षम) असलेला नविन पशुखाद्य प्रकल्प कागल-हातकणंगले पंचतारांकित एम.आय.डी.सी.मध्ये कार्यान्वित करणेत आला आहे.

गोकुळ उत्पादनांची गुणवत्ता व अनोखी चव यामुळे बाजारपेठेतील दूध व दूग्धजन्य पदार्थांच्या मागणीमध्ये सातत्याने वाढत होत आहे. दूध पुरवठ्यामध्ये सातत्य, उत्तम दर्जा व गुणवत्ता, सहज उपलब्धता आणि नैसर्गिक चव यामुळे गोकुळ दूधाला बाजारपेठेत चांगली मागणी आहे. गोकुळ श्रीखंड , गोकुळ तूप, गोकुळ पनीर, गोकुळ दही, गोकुळ लस्सी, गोकुळ टेबल बटर, गोकुळ कुकींग बटर, श्रीखन्ड, मिक्स्ड-फ्रुट श्रीखंड, ताक या सारखी आमची उत्पादने बाजारात सर्वत्र व सहज उपलब्ध आहेत.



VIVEKANAND COLLEGE KOLHAPUR (Autonomous) ESTD JUNE 1964

## गोकुळची खास वैशिष्टै :-

१. संघास महाराष्ट्र शासनाचा **सहकार भुषण पुरस्कार** दोन वेळा मिळाला आहे.

२. गोकुळने गुणवत्ता व्यवस्थापन व अन्न सुरक्षा मानकाच्या आय.एस.ओ. २२०००: २००५ ची अंमलबजावणी केली आहे.

३. संघाचा स्वत:चे दोन पशुखाद्य कारखाने असून त्यांची एकत्रित क्षमता ५०० मेट्रिक टन प्रतिदिन इतकी आहे. दोन्ही पशुखाद्य कारखाने आय.एस.ओ. ९००१: २००८ ने प्रमाणित आहेत.

४. संघास डेअरी उद्योगातील उर्जाबचतीसाठी महाराष्ट्र शासनाचा सन ०८-०९, ०९-१० व ११-१२ या तिन वर्षासाठी प्रथम क्रमांक मिळाला आहे.

५. सन १९८८-८९ ते २००६-०७ या कालावधीत संघास १४ वेळेस 'राष्ट्रीय उत्पादकता पुरस्कार' मिळाला आहे.

६. संघाचे 'मिल्क रिप्लेसर' या नाविन्यपूर्ण उत्पादना साठी भारत सरकारचे पेटंट मिळाले आहे.

७. आर्थिक वर्ष २०१५-१६ मधील संघाची वार्षिक उलाढाल - रु. १७२८ कोटी आहे.

८. प्रकल्पाची सुरवात १९८६ मध्ये २ लाख प्रक्रिया क्षमतेने झाली असून या मागिल २४ वर्षांमध्ये सरासरी वार्षिक वाढीचा दर १० ते ११% आहे.

९. संघाने एका दिवसाला कमाल दूध हाताळणी प्रतिदिन १४ लाख लिटर केली असून सरासरी प्रतिदिन दूध हाताळणी ११.५६ लाख लिटर आहे. सण २०१५-१६ या सालामध्ये गोकुळ दुधाची सरासरी विक्री ९.५३ लाख लिटर्स प्रति दिन इतकी झाली आहे.

VIVEKANAND COLLEGE KOLHAPUR ESTD JUNE 1964 (Autonomous)

## गोकुळ संघाची उद्दिष्टे :-

१) २०२० पर्यंत दैनंदिन २० लाख लिटर दूध संकलन करण्याचा मनोदय.

२) दूध संस्थाच्या व्यवस्थापन समिती सद्स्याना त्यांच्या संस्थेचे व्यवसाय धोरण/आरखडा तयार करण्याचे प्रशिक्षण देणे.

३) दूध संस्थाच्या कर्मच्या-यांना त्यांच्या दैनंदिन कामासाठीचे प्रशिक्षण देणे.

४) संघाच्या सर्व सेवा सुविधा / उपक्रमांची प्रभावी अंमलबजावणी होणेसाठी स्थानिक माहीतगार प्रगतीशील दूध उत्पादक तयार करणे.

५) सहकारी दूध संस्थाच्या प्रशासनामध्ये व महत्वाच्या निर्णय प्रक्रीयेमध्ये महिलांचा सहभाग वाढविणे.

६) महिला नेतृत्व विकसित करण्यासाठी दूध उत्पादक महिलांचा बचत गट तयार करणे.

७) महीलांमध्ये आरोग्य, स्वच्छता आणि साक्षरता या बाबतची जागरूकता वाढविणे.

८) जिल्हा सहकरी दूध संस्था स्तरावर स्वच्छ दूध उत्पादन अभियान योजना राबविणे.

९) दूधाची सुक्ष्मजीव शास्त्रिय गुणवत्ता सुधारण्यासाठी म्हणजे दूधाचा एम.बी.आर.टी. ३ तासांपेक्षा पुढे नेणे तसेच एस.पी.सी काउंट ३०लक्ष प्रति मिली. च्या खाली आणणे.

१०) बचत गटाच्या माध्यमातून महिलांचे आर्थिक सबलीकरण करणे.



VIVEKANAND COLLEGE KOLHAPUR ESTD JUNE 1964 (Autonomous)

## कामकाज :-

संघाचे मुख्य दुग्धशाळेमार्फत खालीलप्रमाणे उल्लेखनीय कामकाज चालते :-

### दूध हाताळणी / प्रक्रिया :-

मागील सालात संघाने स्वतःच्या ४४. ३६ कोटी लिटर्स दुधाची हाताळणी दुग्धशाळेत केली असून जुन्या व नवीन स्थापित क्षमतेचा ८१% वापर केला आहे. संघाने मुख्य दुग्धशाळेकडील हाताळणी व वाहतुक खर्च कमी करून मागणी व पुरवठा यामध्ये समतोल ठेवण्याच्या दृष्टीने बाहेरील सहकारी संघ / संस्थांकडून ११२. ०५ लाख लिटर्स म्हैस दूध वाशी शाखेसाठी व २. ११ लाख लिटर्स दूध गोकुळ मुख्यालयाकडे असे एकूण विक्रीसाठी आवश्यक ११४. १६ लाख लिटर्स संघाचे गरजेनुसार खरेदी केले आहे. त्याची प्रतिदिन सरासरी ३१,२७७ लिटर्स इतकी आहे. यामुळे प्रतिदिन ३१,२७७ लिटर्स दुधाची हाताळणी वाढ होण्यास व संघाचे स्थिर खर्च कमी होण्यास मदत झाली आहे.

### दुग्धजन्य पदार्थ उत्पादन :-

मार्केटमधून आलेल्या दुग्धजन्य पदार्थ्यांच्या मागणीची पूर्तता तसेच विक्री होऊन शिल्लक अतिरिक्त दुधाचे दुग्धजन्य पदार्थामध्ये रूपांतर करून उत्पादकांचे संपूर्ण दूध स्वीकृत केले जाते. मलई विरहित दूध भुकटी, देशी लोणी, कुकिंग बटर, टेबल बटर, तूप, श्रीखंड, पनीर, दही, लस्सी, ताक आणि होल मिल्क पावडर इत्यादी पदार्थांचा समावेश होतो. देशांतर्गत सण २०१७-१८ व सण २०१८-१९ मधील अतिरिक्त पावडर उत्पादन/ साठा जास्त झालेने विक्री न झालेली अतिरिक्त पावडर संघाने निर्यात केली आहे. मागील सालात दूध पावडर निर्यातीसाठी महाराष्ट्र शासनाकडून प्रतिकिलो रु. ५० /- अनुदान जाहीर केले होते.



VIVEKANAND COLLEGE KOLHAPUR (Autonomous) ESTD JUNE 1964

## कार्यक्षेत्राबाहेरील दूध खरेदी :-

कार्यक्षेत्राबाहेरील दूध वाढीस मर्यादा आल्याने व स्पर्धा वाढत असल्याने, कार्यक्षेत्रात दूध वाढीच्या प्रयत्नाबरोबरच ग्राहकांची कृषकाळातील मागणी पूर्ण करण्याच्या दृष्टीने महाराष्ट्र, कर्नाटक, मध्यप्रदेश, गुजरात इत्यादी राज्यातील इतर संघ व संस्थांकडून एकूण ११४.१६ लाख लिटर्स म्हैस दूध गोकुळ व वाशी शाखा पोहोच खरेदी केले आहे. यामुळे एकूण दूध हाताळणीत वाढ होणेस तसेच संघाचा प्रति लिटर स्थिर खर्च कमी होण्यास हातभार लागला आहे. ग्राहकांना सातत्याने गुणवत्तापूर्ण दूध देण्यासाठी कारक्षेत्रात कार्यक्षेत्रात दुधाचे उत्पादन वाढ होणे गरजेचे व महत्वाचे आहे. त्या दृष्टीने संस्था पातळीवर जरूर प्रयत्न ते संघामार्फत करण्यात येत आहेत. त्याचा जास्तीत जास्त फायदा दूध उत्पादकांना होणार आहे.








VIVEKANAND COLLEGE KOLHAPUR ESTD JUNE 1964 (Autonomous)

## उत्पादने :-

गोकुळ दूध संघाची उत्पादने स्थानिक आणि बाहेरच्या बाजारांमध्ये अत्यंत लोकप्रिय आहेत. गोकुळ उत्पादने या नावाने असलेल्या या उत्पादनांमध्ये दूध, श्रीखंड, तूप, टेबल बटर, स्कीम्ड दूध पावडर, देशी लोणी बीएम/सीएम (देशी स्वयंपाकाचे लोणी), लस्सी, पनीर आणि स्वयंपाकाचे लोणी व दही यांचा समावेश होतो.








VIVEKANAND COLLEGE KOLHAPUR
ESTD
JUNE
1964
(Autonomous)

## गुणनियंत्रण :-

२०१८-१९ या सालात शीतकरण केंद्र गोगवे, शीतकरण केंद्र तावरेवाडी व गोकुळ दुग्धशाळा डॉक नं. ४ येथे ऑटो सॅम्पलिंग सिस्टिम बसवणेत आली असून त्याद्वारे ऑटो सॅम्पलिंग कामकाज कार्यान्वित झाले आहे. सध्या गुणनियंत्रण विभागामध्ये DNA च्या तपासणीच्या आधारे म्हैस दुधातील गाय दुधाचे मिक्सिंगचे प्रमाण, तसेच दूध व दुग्धजन्य पदार्थातील वेगवेगळया प्रकारचे रोगजंतू तसेच गायीच्या दुधातील या A1/A2 या प्रकारच्या दुधाची तपासणी दूध व दुग्धजन्य पदार्थातील वेगवेगळ्या घटकांची भेसळ व सर्व तपासण्या जलदगतीने व अचुकपणे करण्याकरिता Real Time P.C.R. या दुधातील DNA तपासणीचे उपकरण कार्यान्वित केले आहे. गुणनियंत्रण विभागामध्ये सण २०१५ पासून दूध तपासणीसाठी Milkoscan FT1 हे उपकरण वापरात असून त्याद्वारे दुधातील फॅट, एस. एन. एफ., प्रोटीन, लॅक्टोज इत्यादी १४ घटकांची तपासणी केली जाते. इंडिफॉस कंपनीकडून दुधातील Targeted Adulterant (भेसळ) तपासणीसाठी TAM (Targeted adulterant module ) हे software तयार केले असून त्याद्वारे Milkoscan FT1 या मशीनमध्ये तपासणी होत असलेल्या घटका व्यतिरिक्त १) अमोनिअम सल्फेट २) डिटर्जंट ३) माल्टोज ४) मेलॅमाईन ५) सॉल्ट ६) सोडिअम कार्बोनेट ७) सोडिअम सायट्रेट ८) सॉरबिटॉल ९) स्टार्च १०) सुक्रोज ११) व्हेजिटेबल ऑइल १२) युरिया १३) ग्लुकोज हे भेसळीचे घटक दर्शविले जातात. सदरचे सॉफ्टवेअर Milkscan FT1 मशीनला जोडलेस दुधातील भेसळ तपासणी करणे सोयीचे असलेले सदर मशीन हे ' फॉरियर ट्रान्सफॉर्म इन्फ्रारेड ' या अत्याधुनिक टेकनॉलॉजिचा वापर करून व भारतीय दुग्धव्यवसायाच्या तपासणीच्या गरजा लक्षात घेऊन तयार केले आहे. सदर मशीनद्वारे फॅट, एस. एन. एफ. ,प्रोटीन इ. घटकांचे अचूक निदान करता येते.



VIVEKANAND COLLEGE KOLHAPUR ESTD JUNE 1964 (Autonomous)

## मार्केटिंग(पणव) :-

उत्पादनांची गुणवत्ता व अनोखी चव यामुळे बाजारपेठेतील दूध व दुग्धजन्य पदार्थांच्या मागणीमध्ये सातत्याने वाढत होत आहे.गतवर्षीप्रमाणे चालू आर्थिक वर्षात देखील दूध व दुग्धजन्य पदार्थांकरिता मंदीचे वातावरण होते. देशपातळीवर सर्व सहकारी व खाजगी दूध प्रकल्पांकडे मोठ्या प्रमाणावर दूध पावडर व लोण्याचा साठा निर्माण झाला होता व बाजारपेठेत उत्पादन खर्चापेक्षा खूपच कमी किंमत मिळत होती. यासाठी शासनाने दूध संघाना मदत करावी अशी सर्वांचीच अपेक्षा होती. शासनाने जुलै २०१८ अखेर निर्णय घेतला कि, दूध प्रकल्पानी देशांतर्गत पावडरचा साठा कमी करणेसाठी पवडर निर्यात करावी व त्यासाठी शासन प्रति किलो ५०/- इतके अनुदान देईल. परंतु याच काळात देशांतर्गत पवडरचा दर रुपये १४०/- प्रति किलो असा होता व आंतरराष्ट्रीय दर रुपये ११०/- ते ११५/- प्रति किलो असा मिळत होता. शासनाने दूध पावडर हि जून २०१८ पूर्वीची असणेची अट घातली होती. त्यास अनुसरुन संघाने दुबई, सीरिया, जॉर्जिया,बांगलादेश व टर्की या देशांमध्ये एकूण ८४५. ४ मे . टन इतकी दूध पावडर मर्चंट एक्सपोर्टद्वारे निर्यात केली आहे. त्याचा सरासरी दर रुपये ११५/- प्रति किलो असा मिळाला असून शासनाकडून मिळणारे अनुदान रुपये ५०/- प्रति किलो गृहीत धरल्यास हा दर रुपये १६५/- प्रति किलो असा मिळणार आहे.

दुग्धजन्य पदार्थांची विक्रि वाढवण्यासाठी शाखेकडे नवीन वितरक नेमणूक चालू केली आहे व यांचेमार्फत मुंबई शहर व उपनगरे ठाणे व रायगड जिल्यांमध्ये दुग्धजन्य पदार्थांची ग्राहकांच्या मागणीनुसार विक्री करण्यात येत आहे. दही व ताकाच्या विक्रीत वाढ होत असल्याने पुढील वर्षात दही व ताकाचे उत्पादन वाशी, नवीन मुंबई येथेच करण्याचे नियोजन करून प्रतिदिन किमान १२-१५ टन विक्रीचे उद्दिष्ट ठेवण्यात आले आहे.



VIVEKANAND COLLEGE KOLHAPUR ESTD JUNE 1964 (Autonomous)

## मायक्रो ट्रेनिंग सेंटर :-

दूध उत्पादकांनी नवनवीन तंत्राचा वापर करून तसेच शास्त्रशुद्ध पद्धतीचा अवलंब करून दुग्धव्यवसाय करण्याच्या उद्देशाने व दूध उत्पादन वाढीसाठी आवश्यक त्या बाबींचा योग्य वेळी वापर करून दूध उत्पादकांना प्रबोधात्मक व प्रात्यक्षिक स्वरूपात एक दिवस प्रशिक्षण देणेसाठी संघाने तिटवे, ता. राधानगरी;कसबा नूल, ता. गडहिंग्लज; चिंचवाड, ता. शिरोळ; नानीबाई चिखली, ता. कागल या चार ठिकाणी मायक्रो ट्रेनिंग सेन्टर्सची स्थापना केली आहे. दूध उत्पादक संस्थेमार्फत पुरुष व स्त्रिया(सपत्नीक) एक दिवसाचे प्रशिक्षण घेण्यासाठी वरील मायक्रो ट्रेनिंग सेंटरला येतात. या प्रशिक्षण वर्गासाठी संघामार्फत ५०% अनुदान दिले जात असून यामुळे दुध उत्पादकांच्या जनावरांच्या व्यवस्थापनामध्ये सुधारणा होऊन किफायतशीर दुग्धव्यवसायासास चालना मिळून दूध उत्पादनात वाढ होत आहे. एका प्रगतशील दूध उत्पादक शेतकऱ्याने त्याच्या गोठ्यात इतर दूध उत्पादक शेतकऱ्याना एक दिवसाचे प्रात्यक्षिक प्रशिक्षण देणे हा मायक्रो ट्रेनिंग सेंटरचा प्रमुख उद्देश आहे.





VIVEKANAND COLLEGE KOLHAPUR ESTD JUNE 1964 (Autonomous)

## खाते व्यवस्थापन आणि सचिव कार्य प्रशिक्षण :-

हे प्रशिक्षण दूध संस्थांच्या सचिवांसाठी आहे. या अभ्यासक्रमात संस्थेच्या आर्थिकव्यवहारा संबंधीत पावत्या तयार करणे, व्हौचर्स तयार करणे, दैनंदीन खाते व्यवस्थापन करणे, व्यवहारानुसार रजिस्टर तयार करणे, ट्रायल बॅलन्स, नफा तोटा पत्रक, ताळेबंद पत्रक, व्यापार पत्रक, दूध डेअरी व्यवसाय माहिती, फिल्ड वर्क व दूध संकलन इत्यादीचे शिक्षण दिले जाते.

## सचिवांसाठी व्यवस्थापन प्रशिक्षण :-

सहकार तत्त्वे, व्यवस्थापन तत्त्वे, कायद्याची ओळख, आणंद पॅटर्न, मासिक व वार्षिक सभा, प्रोसीडींग लेखन, आदर्श सोसायटी बाबतच्या सचिवांच्या जबाबदा-या, दूध आणि दुधामधील घटक, स्वच्छ दूध उत्पादन, जनावरांची देखभाल, दूध संकलना मधील अडचणी व त्यावरील उपाय, पशुखाद्य प्रक्रिया, पशुखाद्याची व वैरण उत्पादनाची माहीती, सोसायटीच्या रेकॉर्डची माहीती, मिल्को टेस्टरचे कार्य, ऑडिट व संबंधीत नियम, दूध संस्थांना भेटी इत्यादी.

## दूध गुण तपासणी प्रशिक्षण :-

शास्त्रशुध्द पध्दतीने दूध उत्पादकांच्या दूधाची तपासणी करणे. सहकाराची तत्वे, आणंद कार्यप्रणाली, दूध आणि दुधाचे घटक, शुद्ध / स्वच्छ दूध उत्पादन, दूध तपासणी प्रक्रियांची माहिती, रसायनाची माहीती प्रात्याक्षिक संस्था भेटीतून स्वत: चे आत्मनिरीक्षण व इतरांशी संबंध ठेवणे, याचा अभ्यास करणे.



VIVEKANAND COLLEGE KOLHAPUR (Autonomous) ESTD JUNE 1964

# महिलांचे सबलीकरण :-

## महिला सहकारी डेअरी नेतृत्व विकास कार्क्रयम :-

ग्रामीण महिलांची जास्तीजास्त शक्ति व वेळ जनावरांची देखभाल, दूध उत्पादना सारख्या दुग्धव्यवसायातील कामासाठी खर्च होत असतो. महिला या ख-या अर्थाने दूध सहकारी संस्थेशी निगडीत असलेने त्याना दूध संस्थांचे सदसत्व देवून संस्थेच्या व्यवस्थापनाची जबाबदारी घेणेस प्रोत्साहीत केले पाहिजे. ग्रामीण महिलांची अंगभूत क्षमता व कर्तृत्व लक्षात घेऊन राष्ट्रीय दुग्ध विकास महामंडळाने यांच्या मार्गदर्शनाखाली चांगल्या आणि यशस्वी महिला डेअरी संस्था निर्माण केल्या पाहिजेत. यासाठी गोकुळने दूध संस्थांमध्ये महिलांचा सहभाग वाढवून आणि त्यांना प्रोत्साहित करण्यासाठी विविध चांगले उपक्रम राबविले आहेत.







VIVEKANAND COLLEGE KOLHAPUR ESTD JUNE 1964 (Autonomous)

## महिला शैक्षणिक सहल :-

स्वच्छ दूध निर्मिती कार्यक्रम व दूध वाढ कृती कार्यक्रमांतर्गत दूध उत्पादक महिलांना गोकुळ प्रकल्प, महालक्ष्मी पशुखाद्य कारखाना येथे सहलींच्या माध्यमातून प्रात्यक्षिकासह माहिती दिली जाते. यामुळे स्वच्छ दूध निर्मिती व दुधवाढ कार्यक्रम चांगल्या प्रकारे राबविण्यास मदत झाली आहे. मागील सालात १४२ सहलींद्वारे ६,४९५ महिलांनी योजनेचा लाभ घेतला आहे.

## स्वयंसेविकांमार्फत घेण्यात येणारे कार्यक्रम :-

महिला नेतृत्व विकास कार्यक्रमाची व्याप्ती वाढविण्यासाठी निवडक महिलांची निवड करून त्यांच्यामार्फत १४७ गावातील संस्थांमधून महिला नेतृत्व विकास कार्यक्रम राबविण्यात आला. या निवडक महिला स्वतः दूध उत्पादक आहेत. दूध व्यवसायातील अनेक प्रशिक्षणे त्यांनी घेतली आहेत. त्यांच्यामार्फत दूध उत्पादक महिलांना प्रशिक्षण दिले जाते. त्यात प्रामुख्याने पंचकमिटी प्रेरणा कार्यक्रम, महिला शैक्षणिक कार्यक्रम, बचत गट संघटन, हिशोब लेखन, प्रात्यक्षिके आणि बचत गट विभागीय मिटींग इत्यादी कार्यक्रमांचा समावेश असतो.

## महिला नेतृत्व विकास कार्यक्रमातून आलेले बदल :-

१) दूध उत्पादक महिला जागृत झाल्या, प्रशिक्षण घेऊन शास्त्रशुद्ध पद्धतीने दूध व्यवसाय करण्याचे महत्व त्यांना पटले व गोकुळशी नाते दृढ झाले.



VIVEKANAND COLLEGE KOLHAPUR ESTD JUNE 1964

२) प्राथमिक दूध संस्था व गोकुळ यांच्यातील दुवा म्हणून काम करू लागल्या.

३) दुग्धव्यवसायातील तांत्रिक माहिती, सेवा-सुविधा यांचा वापर परिणामकारकपणे करून दूध उत्पादन वाढविण्याचा प्रयत्न करू लागल्या.

४) दूध उत्पादक महिला बचत गटांची स्थापना, यशस्वीरीत्या बचत गट चालविणे, दूध उत्पादन वाढविण्यासाठी प्रयत्न करणे व बचत गटातून महिलांचे संघटन करणे.

**बचत गट विषयक :-**

संघाने महिला सबलीकरणासाठी घेतलेले हे महत्वाचे पाऊल आहे. महिलांनी एकत्र येवून एकमेकांशी सुसंवाद साधणेसाठीची ही एक संधी आहे. बचत गटाच्या माध्यमातून ग्रामीण महिला महिन्यातून अथवा पंधरादिवसांतून एकत्र येतात व आपली बचत वर्गणीच्या रुपाने बॅंकेत जमा करतात. ज्यायोगे त्यांच्या छोट्या गरजा अथवा व्यवसायासाठी बॅंकेकडून त्यांना कर्ज मिळते व महिला त्याची परतफेड करतात. मागील सालामध्ये दूध उत्पादक महिलांचे २४८ नवीन बचत गट स्थापन झाले असून त्यामध्ये ३,९०० महिला बचतगटामध्ये सहभागी झाल्या आहेत. महिलांचा सहभाग, त्यांची सक्रियता सर्व पातळीवर वाढावी, प्रशिक्षणातून आलेले चांगले बदल, इतर संस्था गावे यांच्यापर्यंत पोहोचावेत, त्यामध्ये सातत्य राहावे यासाठी गोकुळ सतत प्रयत्नशील आहे.



VIVEKANAND COLLEGE KOLHAPUR ESTD JUNE 1964 (Autonomous)

## दूध उत्पादकांसाठी योजना/ कार्यक्रम :-

### उत्पादकांसाठी प्रॉव्हीडंट फंड योजना :-

दूध उत्पादकांना वयाच्या साठाव्या वर्षी आर्थिक आधार मिळणेसाठी प्रॉव्हीडंट फंड ही योजना प्राथमिक दूध संस्थेच्या माध्यमातून सुरू केली आहे. संघाने यापैकी 'अ' योजने नुसार दूध उत्पादक प्रति लिटर 15 पैसे, संस्था 10 पैसे व संघ वर्गणी 15 पैसे या प्रमाणे रक्कम जमा केली जाते. 'ब' योजनेनुसार दूध उत्पादक प्रति लिटर 10 पैसे व संघ वर्गणी 10 पैसे या प्रमाणे रक्कम जमा केली जात आहे.

### 'किसान' विमा पॅकेज योजना :-

दूध उत्पादकांवर अचानक ओढवणारी आपत्ती व त्या मुळे होणारे आर्थिक नुकसान किंवा उत्पादकांचा मृत्यू या प्रसंगी त्याला आर्थिक मदत मिळावी या हेतुने संघाने दूध उत्पादकांसाठी विमा योजना सुरू केली. विमा धारकांना कमीतकमी विमा हप्त्यामध्ये जास्तीत जास्त लाभ मिळवा हा या योजनेचा मुख्य उद्देश आहे. या योजनेमध्ये दूध उत्पादकांना त्यांचे राहते घर, घरातील वस्तु, शेती उत्पादने, बायो-गॅस, दोन दुभती जनावरे, बैल जोडी, विद्युत मोटर इत्यादीं साठी तसेच आग, भुकंप, वादळ, पूर या पासून होणा-या हानी पासून विमा संरक्षण दिले गेले आहे त्याच प्रमाणे उत्पादक दाम्पत्यास अपघातामुळे मृत्यु, कायमचे अपंगत्व, दवाखाना दाखल खर्च या साठी विमा संरक्षण दिले जाते.


VIVEKANAND COLLEGE KOLHAPUR ESTD JUNE 1964 (Autonomous)

## चारा विकसन :-

गोकुळ दूध संघ केवळ जनावरांच्या आरोग्याची काळजी घेण्यासाठी विस्तार सेवा देत नाही, तर दूध उत्पादनासाठी चाऱ्याच्या विकासाकरिताही विस्तार सेवा पुरवते. जनावरांची उत्पादनक्षमता वाढण्यासाठी, पौष्टिक चारा आवश्यक असतो आणि त्यासाठी गोकुळ हंगामानुसार सुधारित केलेली चाऱ्याची बियाणे पुरवतो आणि लागवडीची शक्यता लक्षात घेऊन, संघाने काही विशिष्ट चाऱ्यांच्या बियाण्यांवर १००% अनुदान देण्याचे ठरविले आहे. शिवाय भाताचे गवत आणि गव्हाचे गवत अशा उपलब्ध असलेल्या अपारंपरिक चाऱ्याची पुरवठाक्षमता व पौष्टिक मूल्य वाढविण्यासाठी, आमच्या देखरेखीखाली यूरीया प्रक्रिया चालू आहे. याच्या जोडीला सुधारित मल्टिकट गवताच्या जाती उदा. सीओ३, मार्वल आणि मल्टिकट ल्यूसर्न (विदेशी गवत) बियाणेही दूध उत्पादकांना पुरवण्यात येत आहेत. ऊसासह आंतरपिक म्हणून ल्यूसर्नची शिफारस करण्यात आली आहे.लागवड केलेल्या चाऱ्याचा वापर करण्यासाठी तसेच चाऱ्याची हानी टाळण्यासाठी गोकुळ दूध संघ देशी चारा कटाई यंत्र आणि भुसा कटाई यंत्र पुरवतो. दर्जेदार चाऱ्याच्या साठवणुकीकरिता गोकुळ दूध संघ सिलोपीट/सिलेजचाही प्रसार करतो.



VIVEKANAND COLLEGE KOLHAPUR ESTD JUNE 1964 (Autonomous)

## वंध्यत्व शिबीर :-

किफायतशीर दूग्ध व्यवसायासाठी दोन वेतातील अंतर हा महत्वाचा घटक आहे. संघाच्या कार्यक्षेत्रा मधील जनावरांमध्ये अन्नातून येणारे पौष्टीक घटक, उपलब्ध चारा, वैरण याचा सखोल अभ्यास गोकुळने केला. त्यानुसार वारंवार प्रजनन, ॲनॉस्ट्रस या सारख्या समस्या निर्माण होत असलेचे आढळून आले आहे. या समस्या सोडविणेसाठी संघाने जून 2013 पासून अशा जनावरांसाठी खास वन्ध्यत्व शिबीरि भरविण्यास सुरवात केली. संघाचे पशुवैद्य तसेच अधिकारी प्रत्यक्ष दूध संस्थेस भेट देऊन जनावरांची तपासणी करुन त्यांच्यावर उपचार करतात हे या शिबीराचे खास वैशिष्ठ्य आहे. तसेच जनावरांच्या आहारावर व त्याच्या पौष्टीकतेवर लक्ष्य केन्द्रीत करुन त्यानुसार शेतक-यांना सल्ला दिला जातो. मिनरल मिक्चरचा वापर, संतुलित आहार, वैरण या बाबतची जागरुकता निर्माण होणेसाठी विविध कार्यक्रमांचे गोकुळमार्फत आयोजन केले जाते. आजअखेर अशा प्रकारच्या कॅम्प व कार्यक्रमांना अतिशय चांगला प्रतिसाद मिळाला असून मिनरल मिक्चरचा वापरसुध्दा परिणामकारक होत असलेचे निदर्शनास आले आहे. हा कार्यक्रम पशुसंवर्धनाचाच एक अविभाज्य घटक बनला आहे.

## गोकुळ ग्राम विकास योजना :-

दूध उत्पादक, प्राथमिक दूध संस्थेंचे कर्मचारी, संचालक मंडळ यांचा प्रशिक्षणाच्या माध्यमातून सर्वांगीण विकास व्हावा



VIVEKANAND COLLEGE KOLHAPUR (Autonomous) ESTD JUNE 1964

यासाठी -संघाने "गोकुळ ग्राम विकास योजना' हा एक खास कार्यक्रम- विकसीत केला आहे. ग्रामीणपातळीवर सदर कार्यक्रम प्रशिक्षणार्थिंच्या सोयीनुसार प्रभावीपणे राबविला जातो. सुरवातीला सदर योजना एन.डी.डी.बी च्या मदतीने १९८९ मध्ये 'को-ऑपरेटिव्ह डेव्हलपमेंट प्रोग्राम' नावाने सुरू झाली. १९९५ नंतर त्यामध्ये आवश्यक सुधारणा करून 'गोकुळ ग्राम विकास योजना' या नावाने राबविण्यात आली. २००५ अखेर गोकुळच्या सर्व ग्रामीण दूध संस्था या योजने अंतर्गत समाविष्ट करून घेतल्या गेल्या आहेत. सन २००५ नंतर गोकुळचे सर्व विस्तार प्रशिक्षण कार्यक्रम 'गोकुळ ग्राम विकास योजना' या एका नावाखाली राबविले जात आहेत.

उदिष्टे :-

१) दूध संस्थाच्या व्यवस्थापन समिती सद्स्याना त्यांच्या संस्थेचे व्यवसाय धोरण/आरखडा तयार करण्याचे प्रशिक्षण देणे.

२) दूध संस्थाच्या कर्मच्या-यांना त्यांच्या दैनंदिन कामासाठीचे प्रशिक्षण देणे.संघाच्या सर्व सेवा सुविधा / उपक्रमांची प्रभावी अंमलबजावणी होणेसाठी स्थानिक माहीतगार प्रगतीशील दूध उत्पादक तयार करणे.

३) सहकारी दूध संस्थाच्या प्रशासनामध्ये व महत्वाच्या निर्णय प्रक्रीयेमध्ये महिलांचा सहभाग वाढविणे.

४) महिला नेतृत्व विकसित करण्यासाठी दूध उत्पादक महिलांचा बचत गट तयार करणे.



VIVEKANAND COLLEGE KOLHAPUR (Autonomous) ESTD JUNE 1964

## सामाजिक उपक्रम :-

### सामाजिक बांधिलकी :-

सामाजिक सेवाभावी संस्थांना आर्थिक व दुधाच्या रूपात मदत, विशेष प्रावीण्य मिळविलेल्या विविध खेळातील खेळाडूंना आर्थिक मदत, दुर्धर व असाध्य आजाराच्या उपचारासाठी आर्थिक मदत, कुस्ती मैदानांना आर्थिक मदतीचा हातभार तसेच शैक्षणिक क्षेत्रामध्ये वेगवेगळ्या स्पर्धा परीक्षा व शालेय महाविद्यालयीन परीक्षांमध्ये विशेष गुणवत्ता प्राप्त केलेल्या विद्यार्थी- विद्यार्थिनींचा यथोचित सत्कार करून संघाने त्यांचे कौतुक केले आहे. संघाने मानवतेच्या दृष्टिकोनातून केरळमधील पूरग्रस्तांसाठी दूध पावडर व रुपये ५१ लाख इतकी आर्थिक मदत पाठवून सामाजिक बांधिलकी जोपासली आहे.

### कामगार कल्याण मंडळ :-

कामगार कल्याण मंडळातर्फे संघाकडील कायम कर्मचारी, त्याची पत्नी, दोन मुले व आई-वडील यांच्या आजारपणामध्ये वैद्यकीय खर्चासाठी मदत करणेत येत आहे. संघ कर्मचार्याचा संघ सेवेत असताना मृत्यू झाल्यास त्याचा कुटुंबीयांना रुपये ४ लाख इतकी आर्थिक मदत दिली जाते. संघ सेवा कालावधीमध्ये कर्मचाऱ्याने एकदाही वैद्यकीय लाभ घेतला नसलेस अशा कर्मचाऱ्यास सेवा निवृत्तीवेळी प्रोत्साहनपर रुपये २५,०००/- इतकी रक्कम दिली जाते. गंभीर आजारपणामध्ये सभासदास रुपये २ लाखापेक्षा जास्त वैद्यकीय खर्च झाल्यास त्या सभासदास


VIVEKANAND COLLEGE KOLHAPUR ESTD JUNE 1964 (Autonomous)

रुपये ७५,०००/- इतकी रक्कम वैद्यकीय मदत म्हणून दिली जाते. आपत्कालीन प्रसंगासाठी सभासदास ५ लाखापेक्षा जास्त वैद्यकीय खर्च झालेस त्यास कामगार कल्याण मंडळाकडून रुपये २. ५० लाख इतकी आर्थिक मदत दिली जाते. लीव्ह बँकेची स्थापना केली असून सभासदास गंभीर आजारपणामध्ये त्याच्या सर्व प्रकारच्या रजा संपल्यानंतर, वैद्यकीय प्रमाणपत्राचे आधारे विश्रांतीसाठी लीव्ह बँकेककडून १६० दिवसापर्यंत पगारी रजा देण्यात येते.

मागील सालात मंडळाकडून एकूण ४७३ कर्मचाऱ्यांना रुपये ५१,२१,६२५ /- इतकी वैद्यकीय मदत तसेच ४ मयत सभासंदाचे वारसांना रुपये १६,००,००० /- इतकी आर्थिक मदत व एका सेवानिवृत्त सभासदास रुपये २५, ००० /- इतके प्रोत्साहनपर आर्थिक साहाय्य करणेत आले आहे.

Gokul



VIVEKANAND COLLEGE KOLHAPUR
ESTD
JUNE
1964
(Autonomous)

# सारांश :-

औद्योगिक समाजशात्र विषयांतर्गत पश्चिम महाराष्ट्रामधील एक अग्रगण्य दूध संस्था म्हुणुन गोकुळ संघाचा अभ्यास करण्याचे आम्ही ठरवले होते. पश्चिम महाराष्ट्राच्या आर्थिक घडामोडींमध्ये गोकुळचा मोठा हातभार आहे. आम्ही संघाचा ऐतिहासिक, सामाजिक, राजकीय आणि आर्थिक अश्या सर्व पार्शवभूमीवर अभ्यास केला. सर्व बाबतीत गोकुळ संघाने बरीच प्रगती केली आहे. कामगारांसाठी व कर्मचाऱ्यासाठी बऱ्याच कल्याणकारी योजना नियोजित करण्यात आल्या आहेत. दूध उत्पादकांची प्रगती आणि महिलांचे सबलीकरण यासाठी संघ विशेष प्रयत्न करत आहे. संघाकडून समाजाप्रती बांधिलकी जपण्यासाठी बरेच समाजउपयोगी कार्यक्रम, योजना, मदत राबवली जाते.

VIVEKANAND COLLEGE KOLHAPUR
ESTD
JUNE
1964
(Autonomous)

## संदर्भ सुची :-


१) ५७ वा वार्षिक अहवाल २०१८-१९

२) www.gokulmilk.coop.

३) इंटरनेट (गूगल)

४) www.justdial.com.

५) www.indiamart.com.

६) www.youtube.com.

७) www.facebook.com.

८) वृत्तपत्र - Times Of India -२३ जाने. २०२०




VIVEKANAND COLLEGE KOLHAPUR
ESTD
JUNE
1964
(Autonomous)

## टिपलेले काही क्षण :-



➢ संघाच्या कर्मचाऱ्यांसोबत चर्चा करताना




➢ कार्यक्षेत्राबाहेर दूध विक्रीसाठी कशाप्रकारे पाठवले जाते याचा आढावा घेताना



VIVEKANAND COLLEGE KOLHAPUR
ESTD
JUNE
1964
(Autonomous)



➢ शीतगृहात उत्पादने ठेवण्यासाठी कशाप्रकारची सोय आहे इत्यादींची माहिती घेताना



➢ जिज्ञासू विद्यार्थी



VIVEKANAND COLLEGE KOLHAPUR
ESTD
JUNE
1964
(Autonomous)

# ऋणनिर्देश

सदरचे संशोधन कार्य सादर करण्यासाठी स्वामी विवेकानंद कॉलेज कोल्हापूर या शिक्षण संस्थेने आम्हाला सर्वांना दिलेल्या संधीबद्दल आम्ही आभारी आहोत. प्रस्तुत संशोधन कार्यात स्फूर्ती देणारे प्रा. चामे सर,प्रा. मस्के सर आणि प्रा. घोरपडे मॅडम यांच्या प्रेरणेने संशोधन अहवाल सादर करणे शक्य झाले याबद्दल आम्ही सर्वजण त्यांचे शतशः आभारी आहोत.

संशोधन काळात आम्हा सर्वांना मदत करणारे आमचे वर्ग मित्र यांचे सुद्धा शतशः आभार.

तसेच संशोधन करत असताना गोकुळ दूध संघातील संचालक, तेथे काम करणारे सर्व कर्मचारी वर्गांनी आम्हाला समजून घेऊन आवश्यक ती माहिती व्यवस्थित रित्या दिल्या बद्दल त्यांचे सुद्धा मनपूर्वक आभार.

तसेच विवेकानंद कॉलेज कोल्हापूर शिक्षण संस्थेचे प्राचार्य एस. वाय. होणगेकर सर यांचे सुद्धा आम्ही मनपूर्वक आभार व्यक्त करतो.

VIVEKANAND COLLEGE KOLHAPUR
ESTD
JUNE
1964
(Autonomous)

# प्रतिज्ञापत्र

पाटील निलेश ज्ञानदेव (५६४५), पाटील प्रमोद मारुती (५६५०),भोसले अरुण शिवाजी (५५०१),जाधव प्रणव बबन (५५५५),नरुटे प्रथमेश पांडुरंग (५६२४),आम्ही घोषित करतो कि कोल्हापुर येथील गोकुळ दूध संघाचा अभ्यास या संशोधन अहवालात सादर करण्यात आलेले संशोधन कार्य संशोधकांनी स्वतःच्या प्रयत्नांचे फलित आहे. त्यासाठी आम्ही आमच्या मार्गदर्शकांकडून मार्गदर्शन तसेच या पूर्वी झालेल्या संशोधन कार्याचा आढावा काळजीपूर्वक घेतला आहे.

उपयोगात आणलेल्या संदर्भाचा योग्य निर्देश करण्यात आला आहे असे आम्ही सर्व जण प्रतिज्ञापूर्वक घोषित करतो.

स्थळ:- कोल्हापूर

दिनांक:-

| अ. क्र. | विद्यार्थ्यांची नावे | पी.आर. एन. क्रमांक | सही |
|---|---|---|---|
| १) | पाटील निलेश ज्ञानदेव | २०१७०२८३०८ | NPatil |
| २) | पाटील प्रमोद मारुती | २०१७०२९२८७ | PPatil |
| ३) | भोसले अरुण शिवाजी | २०१७०५७३४७ | Abosale |
| ४) | जाधव प्रणव बबन | २०१७०२९२०२ | [illegible] |
| ५) | नरुटे प्रथमेश पांडुरंग | २०१७०२९१८५ | Pnarute |



VIVEKANAND COLLEGE KOLHAPUR ESTD JUNE 1964 (AUTONOMOUS)